जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 AUG 2022
पुढारी

# साहित्य, समाजातील लिंगभेदाचे राजकारण नाहीसे होण्याची गरज

## प्रा. अविनाश सप्रे; डहाके, शेख यांना काळसेकर पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवमुक्तीचा स्वर मोठा होण्यासाठी साहित्य व समाजातील लिंगभेदाचे राजकारण नाहीसे करण्याची तीव्र गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी केले. शिवाजी विद्यापीठतर्फे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार-२०२२ आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार-२०२२ प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रा. सप्रे यांच्या हस्ते ज्येष्ठ कवी व समीक्षक वसंत आबाजी डहाके यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, तर दिशा पिंकी शेख यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. २१ हजार व दहा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि ग्रंथभेट असे पुरस्कारांचे स्वरूप आहे.

प्रा. सप्रे म्हणाले, डहाके हे मराठी साहित्याकडे पाहण्याची व्यापक दृष्टी देणारे विचारवंत आहेत. दिशा पिंकी शेख भोवतालातील सारी कुरूपता अधोरेखित करणाऱ्या कवी आहेत.

वसंत आबाजी डहाके यांनी सतीश काळसेकर यांच्या नावे पुरस्कार मिळण्याचा हा क्षण एकाचवेळी आनंददायी वेदनादायक असल्याचे बोलून दाखविले.

दिशा पिंकी शेख यांनी विद्यापीठाकडून मिळालेला हा पहिलाच अधिकृत पुरस्कार असल्याचे सांगितले. कोल्हापूरशी माझे जुने नाते आहे. लढण्याचे बळ देणारी भूमी आहे. आम्ही लिहिण्याचा प्रयत्न करत आहोत. आमच्या लेखण्यांना सामर्थ्य देण्याचे काम विद्यापीठांनी आणि शिक्षण व्यवस्थेने करावे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काळसेकर, हडाके आणि शेख यांच्या लेखनातील वाचन, वास्तववादी मांडणीचा समान धागा अधोरेखित केला. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पुरस्काराच्या अनुषंगाने भूमिका स्पष्ट केली. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. आर.जी. कुलकर्णी, डॉ. सुनीलकुमार लवटे, प्रभा गणोरकर, डॉ. उदय नारकर, डॉ. माया पंडित, डॉ. व्यंकाप्पा भोसले, डॉ. अरुण शिंदे, डॉ. रघुनाथ कडाकणे, तनुजा शिपूरकर उपस्थित होते.



**कोल्हापूर : ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके व कवयित्री दिशा पिंकी शेख यांना काळसेकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी डॉ. रणधीर शिंदे, प्रा. अविनाश सप्रे, सुप्रिया काळसेकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे.**

### आता हरणे लिहू लागलीत...

हरणे लिहीत नव्हती, तोपर्यंत शिकाऱ्यांच्या शौर्यगाथा लिहिल्या जात होत्या. आता हरणांनी हाती लेखणी घेतली आहे. त्या हरणांचे निरागसत्व व शिकाऱ्यांचा हिंस्रपणा दाखविणाऱ्या वास्तववादी कथा आता सामोऱ्या येतील, असे दिशा पिंकी शेख यावेळी म्हणाल्या.

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे १० विद्यार्थी नामांकित संशोधन संस्थांमध्ये एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# 'नॅनो सायन्स'चे विद्यार्थी विविध कंपन्यांत प्रशिक्षणासाठी रवाना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे १० विद्यार्थी भारतीय अवकाश संशोधन संस्थेसह (इस्रो) विविध आघाडीच्या नामांकित संशोधन संस्था व कंपन्यांमध्ये एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी बुधवारी त्यांना शुभेच्छा दिल्या.

विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी'च्या पाच वर्षांच्या एकात्मिक अभ्यासक्रमाच्या अखेरच्या वर्षी विद्यार्थ्यांना पूर्ण एक वर्षाचा संशोधन प्रकल्प किंवा विविध कंपन्यांत प्रशिक्षण करावयाचे असते. या अंतर्गत यंदाच्या शैक्षणिक वर्षात पहिल्या निवड यादीत एकूण दहा विद्यार्थ्यांची संशोधन प्रकल्प तसेच कंपनी प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्यात आली. यात इस्रो (बेंगळूर) - साक्षी निगवेकर, एन. सी. एल. पुणे - अबोली शिंदे, अमित बिरजे, मृदुला धेंडे, रिना सौबम, विनायक निर्मळे, केमसाय इनोव्हेशन पुणे - अभिलाषा देशपांडे, प्रतीक्षा भागनगोल, ऋतुजा चौगुले, प्रो-केअर क्रॉप सायन्स सांगली - सृष्टी काडगे यांचा समावेश आहे.

लोकमत

# 'पर्यावरण अभ्यास' पेपरला ५३ हजार परीक्षार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र चारच्या पर्यावरण अभ्यास (आवश्यक) या विषयाचा पेपर रविवारी दुपारी १ ते २ आणि दुपारी ४ ते सायंकाळी ५ या वेळेत झाला. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ५३ हजार ७१२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

बी. एस्सी., बी. एस्सी. अथवा एम. एस्सी (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), बी. एस्सी कॉम्प्युटर सायन्स, फूड प्रोसेसिंग अँड पॅकेजिंग, फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, फॉरेन्सिक सायन्स, शुगर टेक्नॉलॉजी, बायो टेक्नॉलॉजी, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी आदी विविध ४५ अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण अभ्यास विषयाचा पेपर दिला, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# पर्यावरणशास्त्रसह ४५ विषयांच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रातंर्गत विद्यापीठस्तरावरील परीक्षेतंर्गत रविवारी पर्यावरण विषयासह ४५ विषयांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. ५३ हजार ७१२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

बीए, बीएस्सी. (फूड अँड टेक्नॉलॉजी, बायो-टेक, आयटी, कॉम्प्युटर सायन्स, शुगर टेक), बीएस्सी. (आयटी, इन्व्हायरमेंट सायन्स, कॉम्प्युटर सायन्स), बी.कॉम. (आयटी), एम.कॉम., एलएलबी, बी.टेक., बी.कॉम., बीए., बीसीए, बीबीए, बी. आर्किटेक्चर, बीए, बीएड., बी. व्होक.सह पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# ५३ हजार ७१२ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या एकूण ७४१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांपैकी विद्यापीठ स्तरावरील ५६१ परीक्षा विद्यापीठातर्फे सुरू आहेत. ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने परीक्षा घेतल्या जात आहेत. रविवारी एकूण ४५ अभ्यासक्रमांच्या पर्यावरण शास्त्र विषयाची परीक्षा पार पडली. दोन सत्रांमध्ये ही परीक्षा घेण्यात आली. एकूण ५३ हजार ७१२ विद्यार्थ्यांनी रविवारी ही परीक्षा दिली, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज'ची निर्मिती



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्टार्टअप इनक्युबेशन सेंटरच्या "एसयुके रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशन" सेक्शन ८ कंपनीतर्फे "मंथली इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रमाची निर्मिती केली आहे. त्याद्वारे विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना उद्‌भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीण्यपूर्ण उत्तरे सुचविण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. उपक्रमाअंतर्गत दर महिन्याला एक विषय देऊन त्यावर विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी त्याबाबत त्यांनी शोधलेले प्रश्न त्यावर शोधलेले कल्पक पर्याय अथवा उत्तर विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in वेबसाईटवरील News and Event - Monthly Innovation Challenge लिंकवरील गुगल फॉर्ममध्ये भरावयाचे आहे. या प्रक्रियेतून नावीन्यपूर्ण संकल्पनातून स्टार्टअप स्थापन करणे व त्याद्वारे तंत्रज्ञानाचे समाज हितासाठी प्रभावी हस्तांतरण करणे सोपे होणार आहे. या महिन्याचे चॅलेंज हे IoT (Internet of Things) या संकल्पनेवर असून, त्याद्वारे सामान्य माणसाच्या समस्यांवर नवसंकल्पना सादर करण्याचे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

तरुण भारत

# विद्यापीठात स्टार्टअपला मिळणार चालना

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्टार्टअप इनक्युबेशन सेंटरच्या 'एसयुके रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' या सेक्शन ८ कंपनीमार्फत 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.



- 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमाची निर्मिती
- विविध प्रश्नांवर मिळणार कल्पक पर्याय

या अंतर्गत विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर नाविण्यपूर्ण उत्तरे सुचविली जातात. या उपक्रमाअंतर्गत दर महिन्याला एक विषय घेऊन विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी त्यासंदर्भात त्यांनी शोधलेल्या प्रश्नावर कल्पक पर्याय दिले जातात. याचे उत्तर विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटवरील News and Event - Monthly Innovation Challenge या लिंकवरील गुगल फॉर्ममध्ये भरावयाचे आहे. या प्रक्रियेतून नाविन्यपूर्ण संकल्पनातून स्टार्टअप स्थापन करून, तंत्रज्ञानाचे समाज हितासाठी प्रभावी हस्तांतरण करणे सोपे होईल. या महिन्याचे चॅलेंज हे Internet of Things या संकल्पनेवर असून सामान्य माणसाच्या समस्यांवर नवसंकल्पना सादर करण्याचे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. एम्. एस्. देशमुख यांनी केले.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील ७७१ अभ्यासक्रमाच्या परीक्षांपैकी ५६१ परीक्षा सुरू आहेत. रविवारी ४५ अभ्यासक्रमाच्या पर्यावरणशास्त्र विषयाची परीक्षा पार पडली. ५३ हजार ७१२ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. परीक्षेत गैरप्रकार होऊ नये म्हणून भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. तरी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नियमानुसार परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी केले आहे.